# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक ०९/०८/२०२४ (शुक्रवार)

---

### अवैधरीत्या देशी दारूची वाहतूक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

दिनांक ०८/०८/२०२४ रोजी पोस्टे भिवापूर येथील स्टाफ पोस्टे परीसरात पेट्रोलींग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, महेश मुत्तलवार नावाचा इसम मोसा क्र. एम. एच–४०/एन.एस–५७९९ ने देशी दारूची वाहतुक करतांना भिवापूर कडुन कारगावकडे जात आहे. अशा गोपनीय माहिती वरून पोस्टे टी पॉईंट परीसरात नाकाबंदी केली असता भिवापूरकडुन एक इसम मोसा एम. एच–४०/एन.एस–५७९९ ने जात असता सदर इसमास थांबवुन पाहणी केली असता मोसाचा चालक **आरोपी नामे–महेश नारायण मुत्तलवार वय ३५ वर्ष रा. शिवाजी ले आउट भिवापुर ता भिवापुर जि नागपुर** याच्या ताब्यातून अवैधरीत्या विनापरवाना दोन लाकडी खरडया मध्ये ९६ निपा प्रती निप १८० एम एल एकुण १७,२८० एम एल, किंमती ६७२० रू तसेच मो सा क्र एम एच ४०/एन एच ५७९९ किंमती ३०,०००/– रू असा एकुण ३६७२०/– रू. चा मुद्देमाल मिळुन आला. सदर मुद्देमालाबाबत परवाना विचारला असता परवाना नसल्याचे सांगितले. पोस्टे भिवापूर येथे आरोपीविरूद्ध कलम ६५(अ), (ई) मदाका. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर आरोपीस सुचनापत्रावर सोडण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे भिवापूर येथील ठाणेदार सपोनि जयप्रकाश निर्मल, परी. पोउपनि किरण महागावे व इतर स्टाफ यांनी पार पाडली.

### पोलीस स्टेशन खापा अंतर्गत पोलीस पाटीलांची मासिक बैठक संपन्न

पोलीस स्टेशन खापा येथे आज दिनांक ०९/०८/२०२४ रोजी ११.०० वा. ते १३.३० वा. पर्यंत मा. श्री. अनिल म्हस्के, सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, सावनेर विभाग यांचे अध्यक्षतेखाली पोलीस पाटलांची मासिक बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये सर्व पोलीस पाटील यांचे कडून गावातील हालचाली बाबत माहिती घेऊन सतर्क राहून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये आगामी विधानसभा निवडणुकीसंबंधाने पोस्टे हद्दीतील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे, रेती तस्करीबाबत आळा बसविण्यासाठी मार्गदर्शन केले, दारू आणि जुगार यासारख्या अवैध धंदयांना आळा बसविण्याकरीता मार्गदर्शन केले, पोलीस पाटील यांनी आपापल्या गावात रात्रगस्त करणेबाबत मार्गदर्शन केले, पोलीस पाटील यांना गावातील राजकीय घडामोडीवर लक्ष ठेवण्याकरीता मार्गदर्शन करण्यात आले.

सदर बैठकीला मा. श्री. अनिल म्हस्के, सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, सावनेर विभाग, पोस्टे खापा येथील ठाणेदार सुनिल दहीभाते, पोस्टे खापा येथील बिट अंमलदार व खुपिया स्टाफ तसेच गावातील ४० पोलीस पाटील उपस्थित होते.





पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर